**ठळक बातम्या**

- पाच परदेशी विद्यापीठांची संकुलं महाराष्ट्रात उभारण्यासाठीची इरादापत्रं आज प्रदान
- नीट २०२५ चा निकाल जाहीर/ राज्यातल्या कृशांग जोशीला तिसरा क्रमांक
- शुभांशु शुक्ला आणि इतर ३ अंतराळवीरांचं उड्डाण येत्या १९ जून रोजी होणार
- कसोटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिका विजयाच्या उंबरठ्यावर

**आणि**

- राज्याच्या विविध भागात पावसाचा जोर

**<><><><>**

संपूर्ण जग आज भारताकडे फक्त एक जागा म्हणून नाही, तर ज्ञान आणि माहितीच्या क्षेत्रातला भागीदार म्हणून बघत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज केलं. पाच परदेशी विद्यापीठांची संकुलं महाराष्ट्रात उभारण्यासाठीची इरादापत्रं या विद्यापीठांना आज देण्यात आली, या कार्यक्रमात ते मुंबईत बोलत होते. विकसित भारताच्या प्रवासात हा एक महत्त्वाचा टप्पा असून शिक्षणामुळेच देशाचं भविष्य सुरक्षित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांना आपल्या देशातच जागतिक दर्जाचं शिक्षण परवडण्याजोग्या शुल्कात मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

परदेशी शिक्षणसंस्थांसाठी भारताची दारं उघडण्यात नवीन शैक्षणिक धोरणानं महत्त्वाची भूमिका बजावली आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. विविध परदेशी विद्यापीठांची संकुलं असलेली एक पूर्ण नवी एज्युसिटी भारतात, विशेषतः नवी मुंबईत उभारण्यात येईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

या कार्यक्रमात इंग्लंडमधली युनिव्हर्सिटी ऑफ अॅबरडीन, युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, अमेरिकेतलं इलिनॉय टेक आणि इटलीचं आयईडी स्कूल ऑफ डिझाइन या संस्थांना त्यांची संकुलं राज्यात सुरू करण्यासाठीची इरादापत्रं देण्यात आली. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, या पाचही विद्यापीठांचे

प्रतिनिधी, सिडको आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी आणि इतरही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><>**

एक पृथ्वी - एक आरोग्य यासाठी योगाचा अवलंब या संकल्पनेतून यंदाचा योग दिन २१ जून रोजी साजरा केला जाणार आहे. आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत आजपासून ग्लोबल योगा समिट - योगा कनेक्ट २०२५ या जागतिक शिखर परिषद होत आहे. या शिखर परिषदेचं उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं.

योग ही भारताची जागतिक कल्याणासाठीची देणगी असल्याचं  जाधव यांनी आपल्या भाषणात सांगितलं.

यावर्षी योगदिनाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशातल्या विशाखापट्टणम इथं होणार असून त्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहणार असल्याची माहिती प्रतापराव जाधव यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत दिली. योग दिवसानिमित्तानं दिल्ली, भुवनेश्वर, नाशिक आणि पुडुचेरी इथं प्रत्येकी २५ दिवसांचे विशेष कार्यक्रम झाल्याचं त्यांनी सांगितलं. योग दिनाच्या निमित्तानं योग संगम, योग बंधन, योग पार्क, योग समावेश, योग प्रभाव, योग कनेक्ट, हरित योग, योग अनप्लग्ड, योग महाकुंभ आणि संयोग अशा दहा उपक्रमांची आखणी केल्याची माहिती त्यांनी दिली. यंदाच्या योग दिनी देशात एक लाखांहून अधिक ठिकाणी योग कार्यक्रम होणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

वैद्यकीय शिक्षण प्रवेश परीक्षा नीट २०२५ चा  निकाल जाहीर  झाला  असून त्यात महाराष्ट्राच्या कृशांग जोशीने तिसरा क्रमांक पटकावला आहे. राजस्थानच्या महेश जोशीने प्रथम क्रमांक तर मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियाने दुसरा क्रमांक मिळवला आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या ntaneet.nic.in या संकेतस्थळावर तपशीलवार निकाल उपलब्ध आहे. देशभरातल्या ५५२ आणि देशाबाहेरच्या १४ शहरांमध्ये ४ मे रोजी आयोजित केलेल्या या परीक्षेला २२ लाखांहून अधिक उमेदवार बसले होते.

**<><><><>**

नीट युजी २०२५ परीक्षेतल्या विद्यार्थ्यांची पैशांच्या बदल्यात चांगल्या गुणांचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या दोघांना मुंबईतल्या सीबीआयच्या विशेष न्यायालयानं सोमवारपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

यातला एक आरोपी सोलापूरचा आणि दुसरा नवी मुंबईचा आहे. यातल्या एकाला सोमवारी आणि दुसऱ्याला मंगळवारी अटक झाली होती. हे दोघे नवी मुंबई आणि पुण्यात महाविद्यालय प्रवेशाच्या संदर्भात मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांचे चालक आहेत. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या अधिकाऱ्यांशी ओळख असल्याचे भासवून त्यांनी एकेका विद्यार्थ्याकडून ९० लाख रुपयांची मागणी केली होती. हवाला मार्गाने हे पैसे घेतल्याचे पुरावे सापडले आहेत.

<><><><>

येत्या सोमवारपासून नव्या शैक्षणिक वर्षाला प्रारंभ होत आहे. विदर्भ वगळता राज्यात इतर सर्व विभागांत १६ जूनपासून शाळा सुरू होत आहेत, विदर्भात एका आठवड्यानंतर २३ जूनपासून शाळा सुरू होतील. शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी तसंच मुलांची उपस्थिती वाढवण्याकरता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर ‘शाळा प्रवेशोत्सव’ उपक्रम साजरा करण्यात येणार आहे.

<><><><>

हवाई दलाचे पायलट शुभांशु शुक्ला आणि इतर ३ अंतराळवीरांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात घेऊन जाणारं यान आता १९ जून रोजी उड्डाण करणार आहे. केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी ही माहिती दिली आहे. खराब हवामान आणि यानातल्या तांत्रिक समस्येमुळे या यानाचं उड्डाण दोन वेळा पुढे ढकललं होतं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून पाच दिवस सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सायप्रसचे राष्ट्रपती निकोस क्रिस्टोडोलाइड्स यांच्या निमंत्रणावरून ते उद्या सायप्रसला भेट देतील. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडोलाइड्स यांच्याशी चर्चा करतील, तसंच लिमासोल इथं उद्योगपतींशी संवाद साधतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून प्रधानमंत्री मोदी १६ जून रोजी कॅनडाच्या कानानास्किस इथं जी-७ परिषदेत सहभागी

होणार आहेत. शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी १८ जून रोजी क्रोएशियाला भेट देतील. भारताच्या प्रधानमंत्र्यांनी क्रोएशियाला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

<><><><>

प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी आज दुपारी अन्नत्याग आंदोलन स्थगित केलं. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज त्यांच्याशी चर्चा केली. कर्जमाफीसाठी १५ दिवसात उच्च स्तरीय समिती स्थापन करुन समितीच्या अहवालानुसार कर्जमाफीच्या संदर्भात सरकार निर्णय घेईल असं आश्वासन असलेलं पत्र सरकारच्या वतीनं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं. दिव्यांगांच्या मानधन वाढीसाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्याचं आश्वासनही यात आहे. पीक कर्जाची सक्तवसुली थांबवणं आणि कर्जफेड न केलेल्या शेतकऱ्यांना नव्यानं कर्ज देण्याची मागणी ८ दिवसात पूर्ण करण्याची अट बच्चू कडू यांनी यावेळी ठेवली.

<><><><>

जागतिक क्रिकेट कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात  दक्षिण आफ्रिकेचा संघ विजयाकडे वाटचाल करत आहे. सामन्याचा दोन दिवसांचा खेळ अजून शिल्लक असून, दक्षिण आफ्रिका आपल्या दुसऱ्या डावात विजयापासून केवळ ६९ धावा दूर आहे. काल सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेनं ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २०७ धावांवर रोखला. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियानं ७४ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला दुसऱ्या डावात विजयासाठी २८२ धावांचं लक्ष्य मिळालं. त्याचा पाठलाग करताना आफ्रिकेचा सलामीवीर रिकल्टन अवघ्या सहा धावा करून माघारी परतला. मात्र त्यानंतर शतकवीर एडन मार्करम यानं आधी मल्डर याच्यासोबत अर्धशतकी, तर त्यानंतर कर्णधार बवुमा सोबत नाबाद शतकी भागिदारी करत दक्षिण आफ्रिकेला विजयाच्या उंबरठ्यावर आणलं आहे.

तिसऱ्या दिवस अखेरीस दक्षिण आफ्रिकेनं २ बाद २१३ धावा केल्या असून मार्करम १०२ आणि बवुमा ६५ धावा करून खेळपट्टीवर टिकून आहेत.

<><><><>

राज्याच्या विविध भागात पावसाने जोर धरला असून त्यादृष्टीनं प्रशासनही तयारी करत आहे. आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलांना देण्यात आल्या आहेत.

आषाढवारी निमित्तानं इंद्रायणी नदी पात्रात मोठ्याप्रमाणात भाविकांची गर्दी होत असते. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचं एक पथक देहू इथं तसंच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचं एक पथक आळंदी इथं तैनात करण्यात आलं आहे.

आज सकाळपर्यंतच्या २४ तासात सर्वाधिक ७० मिलीमीटर पाऊस सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाला.

रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाचा जोर वाढलेला असून काल राजापूर तालुक्यात संध्याकाळनंतर जोरदार सरी कोसळल्या. हवामान विभागाच्या नोंदीनुसार, आज सकाळी साडेआठपर्यंत २४ तासांत राजापूर तालुक्यात ११९ मिलिमीटर पाऊस झाला. या तालुक्यातल्या आडिवऱ्याच्या प्रसिद्ध महाकाली मंदिराच्या आवारात पाणी शिरलं. मंदिर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मंदिरात गेल्या ४० वर्षांत अशी परिस्थिती उद्भवली नव्हती. संध्याकाळी सहा ते रात्री १० या वेळेत कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे आडिवऱ्याच्या मुख्य रस्त्यावर जवळपास १० फूट उंचीपर्यंत पाणी साचलं आणि रस्त्यावरच्या खाद्यपदार्थ विक्रीच्या काही हातगाड्या वाहून गेल्याचं गावकऱ्यांनी सांगितलं.

अकोला जिल्ह्यात काल झालेल्या वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसानं शेत आणि फळपिकांचं तसंच घरांचं मोठं नुकसान झालं. अकोट आणि पातूर तालुक्यातील ५८ गावांतील पपई, संत्रा, लिंबू आणि केळी या फळपिकांना पावसाचा तडाखा बसला आहे.

**//<><><><>//**